महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९८८/२०२३ दि.०१/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांचे शुभदिप बंगला, लॅण्डमार्क सोसायटी, लुईसवाडी, वागळे इस्टेट, ठाणे पश्चिम येथे खाजगी निवासस्थान असून सदर ठिकाणी त्यांचे सुपुत्र मा. खासदार, श्री. श्रीकांत शिंदे आणि कुटुंबियांची ये–जा असते. तरी लॅण्डमार्क सोसायटी, लुईसवाडी, वागळे इस्टेट, ठाणे पश्चिम या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या दृष्टिकोनातून खबरदारी म्हणून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नितिन ब्रिजखालून प्रजा स्नॅक्स समोरून सर्व्हिस रोडने लॅण्डमार्क सोसायटी, काजुवाडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **प्रजा स्नॅक्स** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नितिन ब्रिजखालून कामगार नाका कडे जाणाऱ्या रोडने सरळ जावून पुढे अपोलो फार्मसी मेडिकल, रामचंद्रनगर, जिजामाता नगर येथून डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) काजुवाडी कट येथून सर्व्हिस रोडने प्रजा स्नॅक्स कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना काजुवाडी कट, लॅण्डमार्क सोसायटी कॉर्नर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने काजुवाडी कट येथून उजवे वळण घेवून हायवे स्लीप रोडने पुढे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ०१/११/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वा. ते दि. ०७/११/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहिका, फायर ब्रिगेड व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी** :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, संबंधित पो.निरी. वाहतूक उप विभाग ठाणे.

CamScanner